# गंध तुझे

ये जरा; भेटायला, घे ओंजळीतले फुल माझे , गंध सेवण्या तयाचा,
काय सांग जाते तुझे ॥ १ ॥

कळ्या पाकळ्या; लाजतील, येता तुझ्या हातावरी , मृदू पाकळ्या केसरांस,
जरा जडू दे गंध तुझे ॥ २ ॥

या किनारी; वाळूवरी, पुसती जरी सान्या खुणा , तू अशी साथ असता,
पौर्णिमेचा रंग सजे ॥ ३ ॥

सखे गं; सहवास तुझा, रंगतो निळया लाटांपरी , पुन्हा होईल भेट तोवरी,
लाट वाहील काय ओझे ॥ ४ ॥

© सचिन पु. कुलकर्णी
www.saarthbodh.com
FB ID - sachin.kulkarni78